## निशाणी क्र.०५ वरील आदेश

१. वादीतर्फे प्रस्तुतचा अर्ज आदेश ३९ नियम १ व २ कलम १५१ प्रमाणे दाव्याचा अंतिम निकाल लागेपर्यंत दावा मिळकतीची विक्री करु नये, बोजा निर्माण करु नये व कोणत्याही प्रकारचे हस्तांतरण करु नये म्हणून तात्पुरता मनाई हुकूम मिळणेकरीता दाखल करण्यात आलेला आहे.

**अर्जातील वादीचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणेः–**

२. मौजे तळेगाव (बोरी), ता. शिरुर अनंतपाळ, जि. लातूर येथील सर्वे/गट क्र.२७ मधील क्षेत्र १हेक्टर ०आर, सर्वे/गट क्र.६७ मधील क्षेत्र ०हेक्टर ४६आर, सर्वे/गट क्र.६९ मधील क्षेत्र ०हेक्टर ३६आर व ग्रामपंचायत मिळकत क्र.९४/ब क्षेत्र दक्षिण–उत्तर २६.६ फुट व पुर्व–पश्चीम १७.६ फुट ही वादी व प्रतिवादींची वडीलोपार्जित असलेली मिळकत ज्याचे विस्तृत वर्णन दाव्याच्या परिच्छेद क्र.३ मध्ये नमूद असून या दाव्याचा वादविषय असून (येथून पुढे एकत्रीत संक्षिप्ततेसाठी '**दावा मिळकत**' असे संबोधित करण्यात येत आहे.)

३. वादी ही प्रतिवादी क्र.१ ची मुलगी असून प्रतिवादी क्र.४ ही वादीची सावत्र आई आहे तसेच प्रतिवादी क्र.२ व ३ हे वादीचे सावत्र बहिणी–भाऊ आहेत. वादी व प्रतिवादी हे एकत्र कुटूंबातील अविभक्त घटक आहेत. त्यांच्यामध्ये आजपर्यंत कसल्याही प्रकारची तोंडी किंवा लेखी स्वरुपात वाटण्या झालेल्या नाहीत. वादीची आई चंद्रकलाबाई यांचा घटस्फोट झाल्यानंतर प्रतिवादी क्र.१ ने प्रतिवादी क्र.४ सोबत विवाह केलेला आहे. वादीचा विवाह २००८ साली झालेला असून ती तिच्या सासरी राहत आहे. आजपर्यंत दावा मिळकत ही वादी व प्रतिवादी हे संयुक्तरित्या कास्त करीत होते व मिळकतीमधून निघालेल्या उत्पन्नातून प्रतिवादी हे वादीला धान्य किंवा रक्कम स्वरुपात वादीचा हिस्सा देत होते, परंतु काही दिवसापासून प्रतिवादी हे वादीस माहेरी

घेऊन जात नाही व दावा मिळकतीमधून आलेल्या उत्पन्नातील हिस्सा देत नाहीत. प्रतिवादी क्र.४ हिला दावा मिळकतीमध्ये कसलाही हिस्सा नाही. त्यामुळे वादीने प्रतिवादींना विवाद मिळकतीमधील कायदेशीर हिस्सा वाटून देण्याची मागणी दि.१/९/२०२१ रोजी केली असता प्रतिवादींनी नकार दिला तसेच प्रतिवादी क्र.१ हा प्रतिवादी क्र.२ ते ४ यांच्या सांगण्यावरुन व त्यांच्या दबावाखाली येऊन दावा मिळकत त्यांच्या नावे असल्याचा गैरफायदा घेऊन त्रयस्थ व्यक्तीस हस्तांतर करण्याचा प्रयत्न करीत आहे. वास्तविक, दावा मिळकत विक्री करण्याची अथवा बोजा निर्माण करण्याचाी कोणतीही कायदेशीर गरज नाही. प्रतिवादी क्र.४ चा हिस्सा हा प्रतिवादी क्र.१ च्या हिश्यामध्ये समाविष्ट असल्यामुळे व ती सदर दाव्यास आवश्यक पार्टी असल्यामुळे तिस या दाव्यात समाविष्ट करण्यात आले आहे. प्रतिवादी क्र.१ हा दावा मिळकतीत वादीचा हक्क डावलण्याच्या उद्देशाने त्रयस्थ व्यक्तीला हस्तांतर करण्याच्या प्रयत्नात आहे व सदर बाब वादीस समजला आहे. त्यामुळे वादीने प्रस्तुतचा दावा दाखल केलेला असून प्रस्तुत अर्ज मंजूर करण्याची विनंती केलेली आहे.

४. प्रतिवादी क्र.१, ३ व ४ यांनी नि.क्र.१६ अन्वये दाव्यास कैफियत व म्हणणे दाखल केले आहे. वादी ही प्रतिवादी क्र.१ यांची मुलगी असून इतर प्रतिवादी सावत्र आई व सावत्र भाऊ बहिण आहेत. परंतु वादी ही एकत्र कुटूंबाचा घटक नाही. वादीची आई व प्रतिवादी क्र.१ ची पहिली पत्नी घटस्फोट झाल्यानंतर प्रतिवादी क्र.१ ने प्रतिवादी क्र.४ सोबत विवाह केलेला आहे, त्यामुळे प्रतिवादी क्र.४ ही प्रतिवादी क्र.१ यांची कायदेशीर पत्नी आहे. दावा मिळकत एकत्र कुटूंबाची मिळकत होऊ शकत नाही. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे दावा हा सकृतदर्शनी खारीज करण्यात यावे कारण वादीला येणारा तिचा हिस्सा तिच्या लग्नासाठी विक्री केलेला आहे. प्रतिवादी क्र.२ हा अज्ञान असून त्याचा अ.पा.क. नेमल्याशिवाय त्याच्याविरुध्द दावा दाखल करता येत नाही म्हणून वादीचा दावा खारीज करण्यात यावा. तसेच दावा दाखल करण्याचे कोणतेही कारण घडले नाही. प्रतिवादी क्र.१ ने दि.१८/३/२००८ रोजी अविनाश कमलापुरे यांना वादीच्या हिस्सेला येणारी जमीन विक्री केली व ती रक्कम वादीच्या

लग्नामध्ये खर्च केलेली आहे व कायदेशीर गरजेसाठी व्यवहार केलेला आहे. त्यामुळे वादीचा दावा मिळकतीत कसलाही हिस्सा नाही. वादीचा दावा मिळकतीत हक्क नसताना खोटा दावा केलेला असून तो नामंजूर होण्यास पात्र आहे व अर्ज नामंजूर करण्याची विनंती केलेली आहे.

५. प्रतिवादी क्र.२ हे समन्स बजावणी होऊन देखील हजर झाले नाही, म्हणून त्यांच्याविरुध्द प्रस्तुतचा दावा एकतर्फा चालविण्यात आला. वादी व प्रतिवादी व त्यांच्या वकीलांचा पुकारा करता गैरहजर. त्यांच्यातर्फे कोणताही युक्तीवाद करण्यात आला नाही. सदरचा अर्ज हा दि.१८/०९/२०२१ पासून प्रलंबित असल्याने गुणदोषावर निकाली काढण्यात येत आहे.

६. सदर अर्जामधील व म्हणण्यामधील कथन विचारात घेवून सदरचे अर्ज निकाली काढण्याकरीता खालील वादप्रश्ने विचारात घेण्यात आलेले आहेत. सदर वादप्रश्नांना कारणासहीत निष्कर्ष खालीलप्रमाणे नोंदविण्यात येत आहेत.

| **अ.क्र.** | **वादप्रश्ने** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | प्रथमदर्शनी केस वादीच्या लाभात असल्याचे वादी हा सिध्द करतो काय? | होय. |
| २. | न्यायाचा समतोल वादीच्या बाजूने असल्याचे वादी हा सिध्द करतो काय? | होय. |
| ३. | अपरिमित हानीचा वादप्रश्न वादीच्या बाजूने असल्याचे वादी हा सिध्द करतो काय? | होय. |
| ४. | आदेश काय? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## **का र ण मि मां सा**

**वादप्रश्न क्र.१ ते ३ करीताः–**

७. वरील सर्व मुद्दे एकमेकांशी संलग्न असल्यामुळे ते एकत्रीतरित्या

विचारात घेतलेले आहेत.

८. प्रस्तुत प्रकरणात वादीने असे कथन केले आहे की, वाद मिळकत ही एकत्र कुटूंबाची वडिलोपार्जित मिळकत आहे. तसेच वादी ही प्रतिवादी क्र.१ यांची मुलगी असून प्रतिवादी क्र.४ त्याची सावत्र आई व प्रतिवादी क्र.२ व ३ हे तिचे सावत्र भाऊ–बहीण आहेत. प्रतिवादींनी त्यांची कैफियत दाखल करुन वादीसोबत असलेले नातेसंबंध मान्य केलेले आहे. वादीच्या म्हणण्याप्रमाणे प्रतिवादीना कोणतेही कायदेशीर गरज नसताना दावा मिळकतीचा विक्री करण्याच्या प्रयत्नात आहे. तसेच वादी यांनी दावा मिळकतीतील हिस्सा मागितला असता त्यास स्पष्ट नकार देऊन दावा मिळकत विक्री करण्याची धमकी दिली. प्रतिवादीतर्फे नातेसंबंध स्पष्टपणे नाकारण्यात आलेले नाही. तसेच दावा मिळकत ही वडीलोपार्जित असल्याचे देखील नाकारलेले नाही, परंतु वादीचा दावा मिळकतीत हिस्सा नसल्याचे कथन केलेले आहे. वादी यांनी प्रस्तुत अर्जासोबत त्यांचे शपथपत्र दाखल केलेले आहे.

९. वादी यांनी नि.०४ सोबत दावा मिळकतीचा ७/१२ उतारे व ग्रामपंचायतीचा उताऱ्याची प्रत दाखल केलेली आहे. सदर उताऱ्यांचे अवलोकन केले असता दावा मिळकत प्रतिवादी क्र.१ यांच्या नावावर असल्याचे दिसून येते. तसेच सदर उताऱ्यामध्ये प्रतिवादी क्र.१ यांच्या नावावर दावा मिळकत असून वडीलोपार्जित मिळकतीची वाटणी झाल्याचे दिसून येत नाही. दावा मिळकत ही वादी व प्रतिवादींची वडीलोपार्जित असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते.

१०. प्रतिवादींनी दावा मिळकतीत वादीचा हिस्सा तिच्या लग्नासाठी विक्री केल्याचे कथन केले आहे व वादीचा दावा मिळकतीत हिस्सा नसल्याचे सांगितलेले आहे, परंतु दावा मिळकतीत वादीचा हिस्सा आहे किंवा नाही याकरीता संपरिक्षेची आवश्यकता आहे. एकंदरीत पुराव्याचे अवलोकन केले असता प्रथमदर्शनी दावा मिळकती ह्या प्रतिवादी क्र.१ च्या नावे असल्याचे दिसून येते. वादी यांनी प्रस्तुतचा

दावा वाटपासाठी दाखल केलेला आहे. जर वाद मिळकती ह्या ईतर कोणास विक्री किंवा ईतर मार्गाने हस्तांतरित झाल्या तर दाव्यामध्ये गुंतागूंत निर्माण होणार आहे. तसेच वादीचे पैशात न भरुन येणारे नुकसान होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. याउलट, जर प्रतिवादीना वाद मिळकत कोणासही विक्री करु नये असा तात्पुरता आदेश दिला तर त्यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. एकंदरीतच वादीने तिच्या हक्कात प्रथमदर्शनी केस असल्याचे दाखवून दिलेले आहे. तसेच अपरिमीत हानीचा वादप्रश्न व न्यायाचा समातोल हा वादीच्या बाजुने आहे. त्यामुळे सदरचा अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. त्यामुळे मी वादप्रश्न क्र.१ ते ३ चे उत्तर होकारार्थी नोंदवते व वादप्रश्न क्र.४ साठी खालील आदेश पारीत करीत आहे.

**आ दे श**

१. वादींचा अर्ज नि.०५ मंजूर करण्यात येतो.

२. सदर दाव्याचा अंतिम निकाल लागेपर्यंत दावा मिळकतीची विक्री करु नये, बोजा निर्माण करु नये व कोणत्याही प्रकारचे हस्तांतरण करु नये असा तात्पुरता आदेश पारीत करण्यात येत आहे.

३. वादी व प्रतिवादी यांना निर्देशीत करण्यात येते की, त्यांनी दावा लवकरात लवकर चालववावा.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by SHAIKH NAZAKATBI ABDUL LATIF
Date: 2023.03.04 17:38:12 +0530

दिनांकः– ०४/०३/२०२३ (एन.ए.एल.शेख)

ठिकाणः– निलंगा. २रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, निलंगा.